गडचिरोली. दिनांक १३/०७/२०१७

# पोलीस - नक्षल चकमकीत ठार झालेल्या तीन महीला नक्षलींपैकी एकीची ओळख पटली

दिनांक १०/०७/२०१७ व ११/०७/२०१७ रोजी झालेल्या पोलीस नक्षल चकमकीमध्ये तीन महिला नक्षलवादी ठार झाल्या होत्या. ठार झालेल्या नक्षलवादयांची ओळख पटविण्याचे काम सुरु आहे. पैकी आज एका मृत महीला नक्षलवादीची आज ओळख पटविण्यात आली. ओळख पटलेल्या मृत महिला नक्षलवादीचे नाव- ललीता मडावी, वय- २० वर्ष, रा. वडगांव, ता. कोरची, जि. गडचिरोली असे असून ती कंपनी क्रमांक ०४ ची सदस्या होती. ती खून, जाळपोळ, चकमक अशा विविध गुन्हयांमध्ये सहभागी होती.

उर्वरित दोन मिळुन आलेल्या मृत महिला नक्षल्यांची ओळख पटविण्याचे कार्य सुरु असल्याने त्याबाबत सविस्तर माहिती प्रकाशित करण्यात येईल.